ePaper

**पाकिस्तानसाठी हेरगिरी, ठाण्यातून तिघे ताब्यात, ATS ची मोठी कारवाई**

वर्ष - 8 । अंक - 292 | UDYAM-MH-26-0158827




महाईन्यूज ™

### आतील पानांत


- आरसीबी ९ वर्षांनंतर फायनलमध्ये!
- कॅच ऑफ द टूर्नामेंट?
- खासदार इकडे-तिकडे फिरत आहेत
- संरक्षण प्रकल्पांत बेसुमार दिरंगाई !


www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 30 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## संरक्षणमंत्री राजनाथ सिंह कडाडले...

# 'पाकव्याप्त काश्मीर' भारताचा आधी होता, आहे आणि राहील!

## आता, तडजोड नाही, चर्चा फक्त पाकव्याप्त काश्मीरची!

। नवी दिल्ली/ मुजफ्फराबाद
। प्रतिनिधी । महाईन्यूज

**संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी ठणकावून सांगितले की पाकव्याप्त काश्मीर हा भारताचा भाग होता, सध्या आहे आणि भविष्यातही राहील. गृहमंत्री अमित शाह हे देखील जम्मू-काश्मीरच्या दौऱ्यावर होते आणि त्यांनी देखील तेथून पाकिस्तानला ठणकावले आहे.**




### प्रतिनिधी मंडळांचा सूर..

'ऑपरेशन सिंदूर' च्या मोठ्या यशानंतर मोदी सरकारने अनेक प्रतिनिधी मंडळे अन्य देशांमध्ये पाठवली आहेत. दहशतवादाविरोधात भारताची भूमिका आणि पाकिस्तानचा कांगावा, याचे पोलखोल ही प्रतिनिधी मंडळे करीत आहेत. चारही बाजूंनी वातावरण तापले असतानाच पाकव्याप्त काश्मीरमध्येही पाकिस्तानच्या विरोधात उठाव होण्याची शक्यता आहे. तेथील नागरिकांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना साकडे घातले असून पाकिस्तानच्या तावडीतून आम्हाला सोडवा, अशी विनंती केली आहे. त्याला यशही मिळत आहे.

### भारतात सहभागी होणे शक्य?

पाकव्याप्त काश्मीरचा ताबा घेणे भारताला शक्य आहे का? हा मूळ प्रश्न आहे. जबरदस्ती किंवा युद्धाशिवाय हा प्रश्न सुटावा, असे फासे भारत टाकत आहे आणि त्याला यशही येत आहे. बलुचिस्तानप्रमाणे तेथील नागरिकांचे बंड झाले आणि पाकिस्तानची राजवट त्यांनी झुगारून दिली, तर हे शक्य दिसत आहे. पण, त्यासाठी भारतालाही ताकद दाखवावी लागणार असे राजकीय तज्ज्ञांना वाटते.

### 'पीओके' वर बेकायदेशीर ताबा

भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी गुरुवारी भारत-पाक तणाव, अमेरिकेचे शुल्क आणि व्हिसा आणि बांगलादेश यासह अनेक मुद्द्यांवर पत्रकार परिषद घेतली. पाकबाबत ते म्हणाले की, आमचा दृष्टिकोन स्पष्ट आहे, की दहशतवाद आणि चर्चा एकत्र होऊ शकत नाहीत. काही वर्षांपूर्वी भारताने पाकिस्तानला दहशतवाद्यांची यादी सोपवली होती. त्या सर्व दहशतवाद्यांना आमच्या स्वाधीन करा. त्यांनी 'पीओके' वर बेकायदेशीरपणे कब्जा केला आहे. आम्ही त्यावरून पाकिस्तानचा ताबा काढून टाकण्याबद्दल बोलू, असेही ते म्हणाले.

### पाकला दहशतवाद्यांचे कौतुक

पाकमध्ये दहशतवाद्यांचा सन्मान करण्याच्या प्रश्नावर ते म्हणाले की, दहशतवाद्यांना हार घालणे आणि त्यांचे कौतुक करणे, ही तेथे नवीन गोष्ट नाही. जगाला हे देखील समजते की पाक हा दहशतवादाचे जागतिक केंद्र आहे. जर पाकिस्तानमधील दहशतवादी खुल्या व्यासपीठांवर भारतविरोधी विधाने करत असतील, तर त्यात आश्चर्यकारक असे काहीही नाही.

### कोणतेही संबंध द्विपक्षीयच..

रणधीर जयस्वाल म्हणाले, की पाकिस्तानशी असलेल्या आमच्या संबंधांबद्दल आमची भूमिका स्पष्ट आहे. कोणतेही संबंध द्विपक्षीय असावेत. आम्ही पुन्हा एकदा सांगू इच्छितो, की दहशतवाद आणि संवाद एकत्र चालू शकत नाहीत.

> **'मोदी झिंदाबाद' चे नारे..आता 'पीओके' मधूनच उठाव : आम्हाला भारतामध्ये सामील व्हायचंय !**

### सिंधू पाणी कराराबाबत..


सिंधू पाणी कराराच्या बाबतीत, पाक सीमापार दहशतवादाला पाठिंबा देणे थांबवत नाही तोपर्यंत तो करार निलंबित राहील. या बाबतीत, पंतप्रधान मोदींचेही तेच म्हणणे आहे की दहशतवाद आणि संवाद एकत्र चालू शकत नाहीत, दहशतवाद आणि व्यवसाय एकत्र चालू शकत नाहीत तसेच पाणी आणि रक्त एकत्र वाहू शकत नाही.

### पाकचे पंतप्रधान नरमले..

पाकचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी अलिकडेच तुर्की, इराण, अझरबैजान आणि ताजिकिस्तानचा दौरा केला. यादरम्यान, त्यांनी इराण आणि अझरबैजानमध्ये भारतासोबत चर्चा करण्याची इच्छा व्यक्त केली. ते नरमले असले तरी, त्यांच्यावर विश्वास ठेवण्यास भारत सरकार तयार नाही. कारण त्यांच्या हातात काहीच नाही. सर्व निर्णय पाकिस्तानचे लष्कर घेत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### भारत-पाक एकत्र काम करू

काश्मीर, पाणी आणि दहशतवाद यासारख्या समस्या सोडवण्यासाठी दोन्ही देशांनी एकत्र काम करावे, असे शरीफ यांनी अझरबैजानमध्ये सांगितले. शरीफ अझरबैजानमधील लाचिन येथे झालेल्या पाकिस्तान-तुर्की-अझरबैजान त्रिपक्षीय शिखर परिषदेला उपस्थित राहिले. त्यांच्या वक्तव्यामध्ये पाकिस्तानची खुमखुमी कायम होती. पण, दुसरीकडे भारतापुढे लोटांगण घालण्याची तयारी देखील होती.



### 'पीओके' साठी पाकड्यांचे नाक दाबावे लागेल ?

पाकव्याप्त काश्मीर भारतामध्ये सामील होणे शक्य आहे का? या प्रश्नावर अनेक घटनातज्ज्ञ आणि राजकीयतज्ज्ञ रोज चर्चा करत आहेत. बलुचिस्तानप्रमाणे पाकव्याप्त काश्मीर मध्ये उठाव, त्याचवेळी आक्रमक भारताचे दहशतवाद्यांवर हल्ले, आणि पाकिस्तानची जुलूमशाही झुगारून 'पीओके' ने स्वतंत्र होण्याचा निर्णय घेतला, तर तो भूभाग भारतात येऊ शकतो. त्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताला पाकचे नाक दाबावे लागेल, म्हणजे 'पी ओ के घ्या' असे म्हणण्यासाठी त्यांचे तोंड उघडेल !

ePaper
पाकिस्तानसाठी हेरगिरी, ठाण्यातून तिघे ताब्यात, ATS ची मोठी कारवाई

वर्ष - 8 I अंक - 292 | UDYAM-MH-26-0158827




महाईन्यूज ™

आतील पानांत


- आरसीबी ९ वर्षांनंतर फायनलमध्ये!
- कॅच ऑफ द टूर्नामेंट?
- खासदार इकडे-तिकडे फिरत आहेत
- संरक्षण प्रकल्पांत बेसुमार दिरंगाई !


www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 30 मे 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## वैष्णवी हगवणे प्रकरण

# वकिलाचा विपुल वादग्रस्त युक्तिवाद!

## वकिलांची विचारसरणी समाजासाठी घातक, सर्व स्तरातून संताप व्यक्त

**। पुणे । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणात हगवणे कुटुंबाची कायदेशीर बाजू मांडणारे वकील विपुल दुशिंग यांच्या अडचणी वाढल्या आहेत. दुशिंग यांच्या विरोधात संभाजी ब्रिगेडनं तक्रार केली आहे. बार कौन्सिल ऑफ इंडिया आणि बार कौन्सिल ऑफ गोवा यांच्याकडे दुशिंग यांची तक्रार करण्यात आलेली आहे. विपुल दुशिंग यांची सनद कायमस्वरूपी रद्द करण्याची मागणी संभाजी ब्रिगेडकडून करण्यात आलेली आहे. विपुल दुशिंग कोणत्याही पुराव्याशिवाय वैष्णवी हगवणेचं चारित्र्यहनन करत असल्याची तक्रार संभाजी ब्रिगेड करून करण्यात आली आहे. विपुल दुशिंग यांची सनद कायमस्वरूपी रद्द करावी अशी मागणी संभाजी ब्रिगेडने केली आहे.**







हगवणे कुटुंबाचे वकील विपुल दोशी यांनी न्यायालयात केलेल्या युक्तिवादांमध्ये वैष्णवीच्या चारित्र्यावर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांच्या या विधानांमुळे तिच्या कुटुंबीयांमध्ये तीव्र संताप व्यक्त झाला आहे. अभिनेता हेमंत ढोमे यांनी या वकिलाच्या विधानांवर प्रतिक्रिया व्यक्त करत ते 'बुरसटलेले आणि चुकीचे पुरुषी विचार' असल्याचे म्हटले आहे. त्यांनी असेही म्हटले की, अशा वकिलांची विचारसरणी समाजासाठी घातक आहे.

वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणात मोठी बातमी समोर आली आहे. राज्य सरकारने वैष्णवी हगवणे हिचे वडील अनिल कसपटे आणि त्यांच्या कुटुंबियांची मागणी मान्य केली आहे. राज्य सरकारने वैष्णवी हगवणे प्रकरणात कोर्टात बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ सरकारी वकील आर. आर. कावेडिया यांची नियुक्ती केली आहे. अनिल कसपटे यांनी माध्यमांसमोर याबाबतची मागणी केली होती. त्यांच्या या मागणीनंतर सरकारने लगेच याबाबत निर्णय घेतला आहे. राज्य सरकारकडून आज लगेच याबाबत अधिकृत आदेश जारी करण्यात आला आहे. कसपटे कुटुंबियांनी गुन्ह्याची प्रभावी आणि निष्पक्षपणे न्यायालयात मांडणी व्हावी, यासाठी सहायक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी अभियोक्ता म्हणून आर. आर. कावेडिया यांची नियुक्ती करण्याची मागणी केली होती. सहायक संचालक आणि सरकारी अभियोक्ता एस. व्ही. मोरे देसाई यांनी गुरुवारी अधिकृत आदेश जारी करून कावेडिया यांची या प्रकरणात सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे. आर. आर. कावेडिया हे अनुभवी आणि निष्णात वकील आहेत. त्यांनी याआधी अनेक गुन्हेगारी आणि सामाजिक प्रकरणांत सरकारी बाजू प्रभावीपणे मांडली आहे. त्यामुळे त्यांची सरकारी वकील म्हणून आपल्या मुलीच्या आत्महत्या प्रकरणात नियुक्ती करावी, अशी मागणी कसपटे कुटुंबियांनी केली होती. ही मागणी मान्य झाली आहे.

### सरकारकडून कसपटे कुटुंबियांची मागणी मान्य

### खळबळजनक युक्तिवाद

हगवणे कुटुंबियांच्या पोलीस कोठडीवर बुधवारी पुण्याच्या शिवाजीनगर कोर्टात सुनावणी पार पडली. यावेळी हगवणे कुटुंबियांची बाजू मांडणारे वकील विपूल दुशिंग यांनी अतिशय गंभीर आरोप करणारे आणि धक्कादायक दावा करणारा युक्तिवाद केला. त्यांच्या या युक्तिवादाने सगळ्यांना आश्चर्याचा धक्का बसला. वकील विपूल दुशिंग यांनी तर थेट वैष्णवीच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवणारा युक्तिवाद केला. त्यामुळे अनेकांकडून संताप व्यक्त केला जातोय. वैष्णवी ही एका अज्ञात व्यक्तीच्या संपर्कात होती. ती त्याच्यासोबत फोनवर सातत्याने चॅट करायची. त्याचा 18 तारखेला साखरपुडा होता. वैष्णवीचा त्या व्यक्तीसोबत वाद झाला असावा आणि त्यातून तिने आत्महत्या केली असावी, असा दावा विपूल दुशिंग यांनी केला. विपूल दुशिंग यावरच थांबले नाहीत. वैष्णवीच्या पतीने प्लॅस्टिकच्या वस्तूने तिला मारहाण केली. त्या प्लास्टिकच्या वस्तूला हत्यार म्हणायचं का? असा सवाल त्यांनी युक्तिवादात केला. तसेच पती-पत्नीमध्ये भांडण झाल्यावर पतीकडून मारहाण झाली तर तो प्रकार घरगुती हिंसाचारात मोडत नाही, अशी सुप्रीम कोर्टाची जजमेंट असल्याचा दावा या वकिलांनी केला.

### शशांकने जाळून टाळण्याची धमकी दिलेली!

चारित्र्यावर बोलणं हगवणेंना शोभत नाही. माझ्या लेकीचे जिवंतपणी हाल केले. आता तिच्या मृत्यूनंतर तिची बदनामी करु नका, अशी विनंती वैष्णवी हगवणेचे वडील अनिल कस्पटे यांनी केली. यावेळी त्यांच्या डोळ्यांत अश्रू दाटले होते. कस्पटे यांनी हगवणेंच्या वकिलांनी न्यायालयात केलेले सगळे आरोप फेटाळून लावले. हगवणे यांनी लग्न ठरवताना आमच्यावर दबाव टाकला. सोन्याची मागणी केली. आमच्या लेकीचं लग्न आधी दोनदा मोडलं होतं. त्यामुळे आम्ही हुंडा देण्यास तयार झालो. आम्ही त्यांना ५१ तोळे सोनं दिलं होतं. हुंड्याची मागणी पूर्ण न झाल्यास लग्न मोडू, अशी धमकी त्यांनी वारंवार दिली होती, असं वैष्णवीचे वडील अनिल कस्पटे यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. हगवणे कुटुंबाकडे ५ कोटींच्या कार आहेत. त्यांना कोणी हातही लावत नाही. मग ते कस्पटेंकडे फॉर्च्युनर कार का मागतील, असा सवाल हगवणेंचे वकील विपुल दुशिंग यांनी काल विचारला. त्यावर हगवणेंकडे केवळ १ कार आहे आणि ती आम्हीच दिलेली आहे, असं कस्पटे यांनी सांगितलं. 'आम्ही त्यांनी एमजी हेक्टर कार देत होतो. मी एमजी हेक्टर बुकदेखील केली. त्यासाठी पैसे भरले. ही बाब समजताच शशांक संतापला. मला लग्नात फॉर्च्युनरच हवी. एमजी हेक्टर दिली तर ती कार मी पेटवून टाकेन, अशी धमकीच त्यानं दिली होती. त्यानंतर मी एमजी हेक्टरच बुकिंग रद्द केलं. त्याचे पैसेही मग मला परत आले. यानंतर मी फॉर्च्युनर कार बुक केली,' अशी माहिती कस्पटे यांनी दिली.

# रामटेकडीत 75 टन क्षमतेचा नवीन प्रकल्प!

## नवीन कचरा प्रक्रिया प्रकल्पाला स्थायी समितीकडून मंजुरी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कचरा म्हणून टाकल्या जाणाऱ्या गाद्या, सोफा, कपडे तसेच लेदर यावर प्रक्रिया करण्यासाठी महापालिकेच्या वतीने रामटेकडी कचरा प्रकल्पात ७५ टन क्षमतेचा नवीन प्रकल्प उभारला जाणार आहे. या प्रकल्पासाठी १५ वर्षे ठेकेदार नियुक्त करण्यासाठी ६६ कोटी ८ लाख ५३ हजार रुपयांचा खर्च केला जाणार आहे. याचा प्रस्ताव गुरुवारी स्थायी समितीच्या बैठकीत मान्य करण्यात आला.**



### 690 रुपये वाहतूक खर्च देण्यात येणार

दरम्यान, स्थायी समितीची बुधवारी सभा तहकूब केल्यानंतर हा विषय स्थायी समितीसमोर दाखल करून तो घाईगडबडीत मान्य करण्यात आल्याची जोरदार चर्चा महापालिकेत रंगली आहे.स्थायी समितीने या कामाला मान्यता दिल्याने हे काम मे. ग्रीन पृथ्वी सोल्यूशन एलएलपी पुणे या कंपनीला मिळाले आहे. त्यांना प्रकल्प उभारण्यासाठी १३ कोटी ३ लाख ७५ हजार रुपये दिले जाणार आहेत. तर, त्यानंतर १५ वर्षांत एकूण ६६ कोटी ८ लाख ५३ हजार ४४४ रुपये दिले जाणार आहे, असे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. कचऱ्यातील प्रक्रिया न होणाऱ्या गाद्या, चिंध्या, फर्निचर, लेदर, रस्त्यांवरील गाड्या यांची वाहतूक करून त्यावर प्रक्रिया करण्यासाठी ठेकेदाराला महापालिका प्रतिटन ६९० रुपये वाहतूक खर्च देण्यात येणार आहे.

दरम्यान, स्थायी समितीची बुधवारी सभा तहकूब केल्यानंतर हा विषय स्थायी समितीसमोर दाखल करून तो घाईगडबडीत मान्य करण्यात आल्याची जोरदार चर्चा महापालिकेत रंगली आहे. स्थायी समितीने या कामाला मान्यता दिल्याने हे काम मे. ग्रीन पृथ्वी सोल्यूशन एलएलपी पुणे या कंपनीला मिळाले आहे. त्यांना प्रकल्प उभारण्यासाठी १३ कोटी ३ लाख ७५ हजार रुपये दिले जाणार आहेत. तर, त्यानंतर १५ वर्षांत एकूण ६६ कोटी ८ लाख ५३ हजार ४४४ रुपये दिले जाणार आहे, असे प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे. कचऱ्यातील प्रक्रिया न होणाऱ्या गाद्या, चिंध्या, फर्निचर, लेदर, रस्त्यांवरील गाड्या यांची वाहतूक करून त्यावर प्रक्रिया करण्यासाठी ठेकेदाराला महापालिका प्रतिटन ६९० रुपये वाहतूक खर्च देण्यात येणार आहे.घनकचरा विभागाने या प्रकल्पासाठी सूस, बाणेर येथील एका जागेची निवड केली होती. मात्र, येथे या प्रकल्पाला विघनकचरा विभागाचा हा प्रस्ताव बुधवारी आयुक्त कार्यालयात दाखल झाला. आयुक्तांनी त्याला तातडीने मान्यता दिल्यानंतर तो नगरसचिव विभागाकडे दाखल करणे आवश्यक होते. बुधवारची बैठक तहकूब झाल्यानंतर रात्री ८.२० वाजता हा प्रस्ताव नगरविकास विभागाकडे दाखल झाला. त्यासाठी आयुक्त कार्यालय व नगरसचिव कार्यालयातील कर्मचारी रात्रीपर्यंत महापालिकेत होते. गुरुवारी हा प्रस्ताव स्थायी समितीमध्ये मंजूर करण्यात आला. नगरसचिव विभागाचे इंटरनेट चालत नव्हते, त्यामुळे प्रस्ताव उशिरा दाखल झाला. आयुक्तांनी हा प्रस्ताव बुधवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत दाखल केला होता, असा खुलासा नगरसचिव योगिता भोसले यांनी केला आहे. रोध होण्याची शक्यता असल्याचे महापालिका प्रशासनाने रामटेकडी येथील महापालिकेचा भूखंड या प्रकल्पासाठी मिळविण्याचा प्रयत्न केला आहे.हापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी अनेक चुकीचे धोरणात्मक निर्णय घेतले असून आवश्यकता नसतानाही कोट्यवधी रुपयांच्या निविदा काढून त्याला मान्यता दिली आहे. आयुक्त डॉ. भोसले यांच्या कारभाराची चौकशी करावी. नियुक्तीपासून सेवानिवृत्तीपर्यंत महापालिका आयुक्त म्हणून डॉ. भोसले यांनी घेतलेल्या निर्णयाची श्वेतपत्रिका काढावी.

# अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील 3 हजार कुटुंबे बाधित

## पिके, घरे आणि पशुधन यांचे मोठे नुकसान झाले

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जिल्ह्यात पाच दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे तीन हजारांपेक्षा जास्त कुटुंबांना त्याचा फटका बसला आहे. तर, पावसाने सहा ते सात जणांचा बळी घेतला असून, अतिवृष्टीमुळे पशुधनाचेही मोठे नुकसान झाले आहे. दरम्यान, जिल्ह्यातील नुकसानग्रस्त गावातील पंचनामे सुरू करण्यात आले असून, येत्या दोन दिवसांत ही प्रक्रिया पूर्ण होणार आहे. त्यानंतर बाधितांना तातडीने मदत करण्यात येणार आहे.**



### पंचनामे येत्या दोन दिवसांत पूर्ण होणार

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जिल्ह्यातील नुकसानाची माहिती दिली.अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील तीन हजार कुटुंबे बाधित झाली आहेत. पुण्यासह खेड, शिरूर येथे विविध कारणांमुळे सहा ते सात जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. पावसामुळे शेती आणि पशुधनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, अतिवृष्टीग्रस्त भागाचे पंचनामे येत्या दोन दिवसांत पूर्ण होणार आहे.

इंदापूर, दौंड आणि बारामती या तालुक्यांत पाच दिवसांपूर्वी ढगफुटीसदृश पाऊस झाला. या तिन्ही तालुक्यांतील अनेक गावांना अतिवृष्टीचा फटका बसला. पावसामुळे शेतशिवारांमध्ये पाणी साचले. शेतातील चिखलामुळे काढणीला आलेल्या विविध पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने संसारोपयोगी साहित्यही वाहून गेले. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री अजित पवार यांनी अतिवृष्टी झालेल्या गावातील पंचनामे तातडीने करण्याचे आदेश दिले होते. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी जिल्ह्यातील नुकसानाची माहिती दिली.अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील तीन हजार कुटुंबे बाधित झाली आहेत.

पुण्यासह खेड, शिरूर येथे विविध कारणांमुळे सहा ते सात जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. पावसामुळे शेती आणि पशुधनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, अतिवृष्टीग्रस्त भागाचे पंचनामे येत्या दोन दिवसांत पूर्ण होणार आहे. त्यानंतर बाधित क्षेत्राची संख्या निश्चित होईल. त्यानंतर बाधित नागरिक आणि शेतकऱ्यांना जिल्हा प्रशासनाकडून तातडीने मदत पोहोचविली जाईल, असे डुडी यांनी सांगितले. दरम्यान, 'अतिवृष्टीग्रस्तांना मदत म्हणून पाच हजार रुपये नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली आहे. मात्र, पालकमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनंतर ही रक्कम दुप्पट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बाधितांना दहा हजार रुपये देण्यात येतील. याबाबतचा अध्यादेश प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या मदतीसोबत बाधित कुटुंबीयांना दोन महिने अन्नधान्य आणि शिधा पुरविण्यात येणार आहे,' असेही डुडी यांनी स्पष्ट केले.इंदापूर, दौंड आणि बारामती या तालुक्यांत पाच दिवसांपूर्वी ढगफुटीसदृश पाऊस झाला. या तिन्ही तालुक्यांतील अनेक गावांना अतिवृष्टीचा फटका बसला. पावसामुळे शेतशिवारांमध्ये पाणी साचले. शेतातील चिखलामुळे काढणीला आलेल्या विविध पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक घरांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने संसारोपयोगी साहित्यही वाहून गेले. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री अजित पवार यांनी अतिवृष्टी झालेल्या गावातील पंचनामे तातडीने करण्याचे आदेश दिले होते.

## भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश

# मौजे चऱ्होलीची प्रस्तावित TP SCHEME अखेर रद्द!

## भूमिपुत्रांच्या एकजुटीचा विजय : प्रशासनाने प्रक्रिया थांबवली

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सुट्ट्यांचा हंगाम सुरु झाला की, नागरिकांना मूळ गावी जाण्याचे किंवा नातेवाईकांना भेटण्यासाठी अथवा पर्यटनाला जाण्याचे वेध लागतात. ह्या काळात रेल्वेला असलेली गर्दी, प्रतीक्षा यादी बघता सामान्य नागरिक हा खासगी प्रवासी बसद्वारे प्रवासाला प्राधान्य देतो. मात्र ,नेमकी प्रवाश्यांची ही गरज ओळखून खासगी बस मालकांनी प्रचंड भाडेवाढ केली आहे. यातून ग्राहकांची पिळवणूक आणि लूटमार सुरू आहे.**



पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने मौजे चऱ्होली येथे प्रस्तावित केलेली TP Scheme अखेर रद्द करण्यात आली. प्रशाससनाने आज तशी घोषणा केली आणि आगामी सर्वसाधारण सभेत त्या प्रस्तावाला मंजुरी देऊन 'नोटिफिफकेशन' काढण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकरी, भूमिपुत्र आणि स्थानिक नागरिकांच्या एकजुटीचा विजय झाला असून, भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्याला यश मिळले आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत सध्या प्रशासकीय राजवट सुरू आहे. प्रशासनाने मौजे चिखली आणि चऱ्होलीसह शहरातील काही गावांमध्ये TP Scheme राबवण्याची योजना आखली होती. स्थानिक भूमिपुत्र आणि नागरिकांना विश्वासात न घेता ही Scheme लादण्याचा प्रयत्न सुरू होता. या TP Scheme ला तीव्र विरोध करण्यात आला.

दरम्यान, भाजपा आमदार महेश लांडगे यांनी भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी या TP Scheme विरोधात रान पेटवले. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्यासोबत तीन बैठका घेतल्या. शहराच्या स्थापनेपासून भूमिपुत्रांवर अन्याय झाला आहे. सुरूवातीला एमआयडीसीए, त्यानंतर नवनगर प्राधिकरण आणि महापालिका हद्दीत समावेश झाल्यानंतरही विविध आरक्षणांसाठी शेतकऱ्यांच्या जमीनी घेतल्या आहेत. आता TP Scheme च्या माध्यातून शेतकरी भूमिहीन होतील. त्यामुळे आमचा TP Scheme ला तीव्र विरोध आहे. तसेच, संपूर्ण शहराचा सुधारित विकास आराखडा (DP) तयार होत असताना TP Scheme चा आग्रह कशासाठी? असा प्रश्नही आमदार लांडगे यांनी उपस्थित केला होता.

भूमिपुत्रांची एकजुट आणि आमदार महेश लांडगे यांची साथ यामुळे मौजे चिखली येथील TP Scheme रद्द करण्याचा निर्णय प्रशासनाला घ्यावा लागला. त्यानंतर मौजे चऱ्होलीची TP Scheme रद्द करण्यासाठी महापालिका भवनासमोर आंदोलन करण्यात आले.

त्यानंतर ग्रामस्थांची बैठक झाली आणि शुक्रवारी, दि. 30 मे रोजी चऱ्होली बंदची हाक दिली होती. माजी महापौर नितीन काळजे, सामाजिक कार्यकर्ते सचिन तापकीर यांच्यासह ग्रामस्थांनी वज्रमुठ बांधली होती. विशेष म्हणजे, आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भूमिपुत्रांच्या हितासाठी निर्णय घ्यावा लागेल, अशी मागणीही केली. त्यामुळे महापालिका प्रशासनाने नमते घेतले आणि चऱ्होलीची TP Scheme रद्द करण्यात येणार आहे. याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मौजे चऱ्होली येथील प्रस्तावित TP Scheme सुरू केलेल्या प्रक्रियेला स्थगिती दिली. भूमिपुत्र आणि आमदार महेश लांडगे यांनी सदर TP Scheme ला विरोध केला आहे. त्यामुळे प्रक्रिया स्थगित करीत आहोत. तसेच, प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करुन TP Scheme रद्दबाबत निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात येईल.

> माझ्या गेल्या 20 वर्षांतील सामाजिक व राजकीय जीवनाचा केंद्रबिंदू म्हणून पिंपरी-चिंचवडमधील भूमिपुत्र राहीला आहे. त्यामुळे भूमिपुत्रांच्या हिताबाबत कोणतीही तडजोड नाही, अशीच माझी भूमिका आहे. चिखली आणि चऱ्होली दोन्ही गावातील TP Scheme रद्द झाली. तसे नोटिफिशेन लवकरच काढण्यात येईल. महानगरपालिका प्रशासनाचे मनापासून आभार मानतो. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत पाठबळ दिले. शास्तीकर सरसकट माफी असो, प्राधिकरण परतावा आणि बफर झोन रद्द करण्यासारखे निर्णय भाजपा महायुती सरकारने घेतले. या पुढील काळातही भूमिपुत्रांच्या न्याय्य हक्कांसाठी कायम आग्रही राहणार आहे.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

## आळंदीपासून हाकेच्या अंतरावर पालिका कत्तलखाना उभारणार

## इंद्रायणीनदी लगतच आरक्षणाच्या प्रस्तावामुळे प्रशासनाचा निषेध

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने नुकताच प्रसिद्ध केलेला प्रारूप सुधारित विकास आराखडा नव्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. मोशी-डुडुळगाव सीमेवर आळंदीपासून हाकेच्या अंतरावर इंद्रायणी नदीजवळ तब्बल ४ एकर जागेवर कत्तलखाना प्रस्तावित करण्यात आल्याने,हिंदुत्ववादी संघटना आणि वारकरी संप्रदायामध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.**



पिंपरी चिंचवड प्रशासनाने मोशी येथील सर्वेक्षण क्रमांक ३२५ (स.न. ३२५) च्या जागेवर हा कत्तलखाना प्रस्तावित केला आहे. विशेष म्हणजे, याच स.न.३२५ मध्ये देहू-आळंदी रस्त्यावरील महर्षी वेदव्यास प्रतिष्ठानद्वारा संचलित वेदश्री तपोवनच्या अगदी लगत आरक्षण क्र. ५/२२० अन्वये कत्तलखाना प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच कत्तलखान्याला लागूनच आरक्षण क्र. ५/२२१ नुसार सुमारे ४ एकर क्षेत्रावर जनावरांचा दवाखाना देखील प्रस्तावित करण्यात आला आहे.


### वारकरी संस्थांचा संताप

दरम्यान या प्रस्तावित आरक्षणाविरोधात वारकरी संस्थांनी संताप व्यक्त केला आहे. पवित्र नद्या, धार्मिक तीर्थ स्थळे आणि स्थानिक लोकभावना यांचा विचार न करता अशा प्रकारचा प्रस्ताव आणल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वारकरी आणि समस्त हिंदू समाजाच्या भावना दुखावल्याबद्दल प्रशासनाने जाहीर माफी मागावी, अशी मागणीही करण्यात येत आहे.

### आंदोलनाचा इशारा

माजी स्थायी समिती सभापती सिमा सावळे यांनी या प्रस्तावावर संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली असून, प्रशासनाचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे. "इंद्रायणी नदी आणि आळंदीसारख्या पवित्र तीर्थ स्थळाजवळ कत्तलखाना प्रस्तावित करून प्रशासनाने संपूर्ण हिंदू समाजाच्या आणि विशेषतः वारकरी संप्रदायाच्या भावना दुखावल्या आहेत," असे सावळे यांनी नमूद केले."जनावरांचा दवाखाना आणि कत्तलखानाशेजारी शेजारी प्रस्तावित करणे म्हणजे निव्वळ मूर्खपणा आहे," असे सिमा सावळे म्हणाल्या. हे नियोजन वैज्ञानिकदृष्ट्या आणि नैतिकदृष्ट्याही चुकीचे असून, प्रशासनाच्या दूरदृष्टीचा अभाव स्पष्टपणे दर्शवते. या विरोधात आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### भगवंताची तळमळ लागायला पाहिजे.

ज्याला जे आवडते ते आपण केले तर त्याला गोड लागते. भगवंताला प्रेमाशिवाय दुसऱ्या कशाचीच गरज नसते. भगवंताचे प्रेम यायला त्याच्याशी आपलेपणा लावून ठेवावा. भगवंत जोडल्याशिवाय नाहीच राहणार, असे ठरवावे. भगवंत जोडावा हे ठरल्यावर, मला लोक नावे ठेवतील याचा कशाला विचार करावा ? निश्चय आहे तिथे सर्व काही सुचते. तळमळ लागली म्हणजे मार्ग दिसतो. साधुसंत मार्ग दाखवायला सतत तयार असतात; मात्र आपण आपली देहबुद्धी बाजूला ठेवून त्यांना शरण जावे. सर्व जग जर भगवंताचे आहे तर मग काळजीचे कारण काय ? उपाधी कोणी लावून घेतली ? माझी मीच ! मी निर्दोष होईन तेव्हाच लोक मला तसे दिसतील. आपल्या सर्व अवगुणांना कारण म्हणजे ' मी रामाला विसरलो ' हेच आहे. परमात्म्याचा विसर पडतो हेच खरे पाप. कोणी पाहात नसेल तिथे वाईट कर्म आपण करतो; पण भगवंत चोहोकडे पाहतो अशी जाणीव ठेवली, म्हणजे असे पाप घडणार नाही. कोणतेही कर्म करताना फळाची आशा धरली तर ते घातुक होते. ज्याने भगवंत जवळ आणला जातो तेच चांगले कृत्य. स्नानसंध्या केली, आणि व्यवहार खोटा केला, तर त्या संध्येचा काय उपयोग ? मनात कोणताही हेतू न धरता परमेश्वरावर श्रद्धा ठेवून वागावे. मन परमेश्वराला अर्पण करावे, ते दुसरीकडे गुंतवू नये. एकदा अर्पण केलेल्या मनाला जर पुन: विषयाचा आनंद झाला, तर ते अर्पण झाले नाही असे समजावे. माझा प्रपंच व्हायचा असेल तसा होवो, पण तुझा विसर पडू देऊ नको, असे अनन्य भावाने भगवंताला म्हणावे. प्रत्येक कृतीत, ' मी भगवंताचा आहे ' ही जाणीव ठेवावी. पडत्या काळातही जो भगवंताचा होऊन राहतो त्याला कशाचीच भीती नाही वाटत. पांडवांच्याजवळ प्रत्यक्ष भगवान असताना त्यांना किती संकटे सोसावी लागली ! संकट येऊ देऊन मग त्यातून बाहेर काढण्यापेक्षा भगवंताने संकटे टाळलीच का नाहीत, याचे उत्तर देणे सोपे आहे. पुष्कळ वेळा, आपल्यावर येणारे संकट कुणी टाळले, तर ते संकट येणारच नव्हते असे आपण समजतो. खरे सांगायचे म्हणजे संकटे ही आपल्या कर्माचीच फळे असतात. संकटांमध्ये भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव राहिली तर ती आपल्याला समाधान देते. ज्यांना सर्व अनुकूल आहे त्यांनादेखील समाधान हे नसतेच; म्हणून, ज्यांना तितकी अनुकूलता नाही त्यांनी त्याबद्दल असमाधान ठेवण्याचे कारण नाही, कारण समाधान हे त्यामध्ये नाहीच नाही. असमाधान हा रोग सर्वांचा एकच आहे, आणि भगवंताचे स्मरण हे औषधही सर्वांना एकच आहे.

बोधवचन:- ज्याचे समाधान भगवंतावर अवलंबून आहे, त्याचे समाधान कोणत्याही परिस्थितीमध्ये टिकेल.



'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

**'मान्सून..कमिंग सून' असे दरवर्षी हवामान खाते ओरडून ओरडून सांगत असते..अंदमानमध्ये आला..केरळच्या किनारपट्टीवर धडकला.. गोव्यात आला.. महाराष्ट्रात पोहोचला..असे दरवर्षी वातावरण असते..पण, यंदा अंदमानमध्ये आला आला, म्हणत त्याने महाराष्ट्रही व्यापून टाकला! 'सर्जिकल स्ट्राईक' म्हणजे काय हेच दाखवून दिले!**

# पावसाचा सर्जिकल स्ट्राईक, शेतकऱ्याच्या नशिबी फाईट!



### पैसा झाला खोटा...

खरोखर, यावर्षी अवकाळी पाऊस सुरु झाला, असे म्हणता म्हणता चक्क मान्सूनचा पाऊस येऊन थडकला. चक्क, बारा दिवस अगोदर पाऊस देशात पोहोचला आहे. तसेच मान्सूनपूर्व पाऊस ही दमदार झाला आहे. मुंबईचा विचार करायचा झाला, तर नावे सफाईसाठी आणि मिठी नदीचा गाळ काढण्यासाठी खर्च केलेला पैसा खोटा ठरला आहे, एवढा पाऊस मोठा आला आहे!

### बळीराजा सुखावण्याऐवजी चिंतेत..

खरे तर, या पावसानंतर पेरणीसाठी शेतकऱ्यांची लगबग सुरु होते. मे महिन्यात शेते तयार केली जातात. वळवाच्या पावसानंतर जमिनीला वाफसा येतो. मग होणारी पेरणी आणि जून, जुलैमध्ये होणारा पाऊस हा सगळा क्रम यावर्षी चुकलेला दिसतो आहे. पावसाचे आगमन सात जुलै ऐवजी साधारण एक पंधरवडा आधीच झाल्याने शेतीचे जे नुकसान झाले आहे, त्याचे पंचनामे करण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. आता नुकसान भरपाई कधी मिळेल ? सांगता येत नाही, ही वस्तुस्थिती आहे. शेतकऱ्यांना द्यायला सरकारजवळ किती पैसे आहेत आणि ते कुठून देणार? हा प्रश्न विचारणे, हे हल्ली खुले गुपित ठरू पाहत आहे. मात्र, काही प्रमाणात तरी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यायला पाहिजे अशी स्थिती नक्कीच आहे.

### तापलेल्या उन्हाळ्याचा अनुभव !

यंदा विदर्भात अकोला, चंद्रपूरमध्ये पारा ४३ ते ४५ अंशापर्यंत गेला. त्यानंतरचे दोन महिने जादा तापमानाचे असतील, असा अंदाज होता. परंतु एप्रिलची सुरुवात अवकाळी पावसाने झाली. फक्त विदर्भच नाही, तर मुंबई, कोकणातही एप्रिलच्या पहिल्याच आठवड्यात पावसाने हजेरी लावली. यामुळे ऐन उन्हाळ्यात पावसाळ्याचा अनुभव सध्या महाराष्ट्राला येत आहे. राज्यात या वर्षी तरी अवकाळी पाऊस होणार नाही, असे वाटत होते; परंतु, गेल्या दीड महिन्यांपासून राज्यात नियमित मान्सूनसारखा पाऊस पडतो आहे. अवकाळी पाऊस का पडतो, यामागे विज्ञान आहे, त्याचे विश्लेषण हवामानतज्ज्ञ सांगतात.

### मान्सूनचा पॅटर्न बदलला..

ज्या विदर्भात पारा ४५ अंशावर पोहोचला होता, तिथेच सर्वाधिक पाऊस कोसळला, मान्सूनच्या पॅटर्नमध्ये लक्षणीय बदल झाला आहे. शेतजमिनीमध्ये रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे बाष्पीभवनाच्या स्तरांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होऊन वातावरणामध्ये भोवरे तयार होतात आणि त्या भोवऱ्यामध्ये बाष्प अडकते. वेगवेगळ्या ठिकाणचे कमी जास्त तापमान आणि वायुदाब यामुळे वारे वाहू लागतात. बाष्पीभवन एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित झाल्यामुळे पाणी धारण करणारा ढग तयार होऊन पाऊस पडतो.

### मराठवाडा तर ढगफुटीचा प्रदेश..

महाराष्ट्रात आपण साधारणतः दि. ७ जून ते ३० सप्टेंबर असे चार महिने पावसाळा धरायचो, ते निसर्गचक्र कायम असायचे. पण, मान्सून पॅटर्न बदलामुळे चक्रीवादळ, गारपीट, ढगफुटी यांच्याही अनियमित बदलामुळे मराठवाडा हा ढगफुटीचा प्रदेश बनला की काय? अशी शंका येते. अवकाळी पावसाने विजांच्या कडकडाटासह पाऊस पडला. यात वित्तहानीसोबतच जीवितहानीदेखील झाली. माणसे, जनावरांचा वीज पडून मृत्यू झाला, बुलढाणा जिल्ह्यात चार हजार हेक्टरवरील रब्बी पिकांचे आणि फळबागांचे नुकसान झाले. अमरावतीमध्ये सर्वाधिक नुकसान आतापर्यंतचे झाले आहे. उन्हाळ्यात बाजारपेठांमध्ये धान्य आणि इतरही पदार्थ बाहेरच असतात, त्यांचीही नासाडी अवकाळी पावसामुळे झाली. कोकणात एप्रिलच्या सुरुवातीलाच सलग दोन दिवस पाऊस पडत होता. यामुळे रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात आंबा, काजूचे मोठे नुकसान झाले. कोकणात झालेल्या अवकाळी पावसामुळे फळबागांचे नुकसान झाले.

### हातातोंडाशी आलेला घास..

शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास अवकाळी पावसाने हिरावून घेतला. नाशिक जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कांद्याचे उत्पादन होते. येथेही अवकाळी पावसाने चुमाकूळ घातला. अवकाळी पावसाचा कांदा उत्पादकांना सर्वाधिक फटका बसला. एप्रिलच्या सुरुवातीला सुरू झालेला अवकाळीचा फटका राज्यात दर दोन-तीन दिवसांनी कुठल्या ना कुठल्या भागाला आता मेच्या अखेरीसही बसत आहे. मुंबईपासून पश्चिम महाराष्ट्रापर्यंत आणि विदर्भ, मराठवाड्यापासून नाशिक आणि उत्तर महाराष्ट्रात अवकाळीच्या कोसळधारा कोसळत आहेत. ऐन उन्हाळ्यात ऐतिहासिक वेरुळ लेण्यावरील धबधबा प्रवाहित झाला आहे. उन्हाळ्यात निर्माण झालेल्या आल्हाददायक वातावरणामुळे शहरी मध्यमवर्गीय सुखावला असला तरी महिन्याभराच्या या अवकाळीमुळे २१ जिल्ह्यांतील ८६ तालुक्यांमध्ये अतोनात नुकसान झाले आहे.

### नुकसानग्रस्तांना दिलासा द्या..

पावसाने झोडपल्यानंतर राज्य सरकारने अवकाळीग्रस्तांचे, पीडितांचे म्हणणे ऐकून घेण्याची गरज आहे. मदत आणि पुनर्वसन खाते राज्य सरकारकडे आहे. स्वतंत्र कृषी विभाग आहे. त्यामुळे या संबंधित खात्यांनी नुकसानग्रस्तांना दिलासा देण्याची नितांत आवश्यकता आहे. मान्सून किंवा मान्सूनपूर्व कालावधीव्यतिरिक्त पडणारा पाऊस म्हणजे अवकाळी पाऊस म्हणून ओळखला जातो. पण, यंदा पावसाळ्याइतका सर्वदूर आणि जास्त पाऊस झाल्याने हंगामात पावसाने दगा देऊ नये, अशी भीती व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याची आवश्यकता आहे. या सगळ्यावर विचार करता बदलत्या हवामानास कृषीसाठी पर्याय पिकांचा शोध घेतला पाहिजे. हवामान बदल होऊ नये यासाठी पर्यावरण निदान आहे, ते तरी ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

### शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन हवे!

पर्यावरणाचा आणि पावसाचा लहरीपणा दरवर्षी हल्ली फटका द्यायला लागला आहे. यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारे एखादी खाते सरकारने सुरू करावे आणि अत्याधुनिक यंत्रणेद्वारे क्षणाक्षणाला गावागावात माहिती पुरवावी. पाऊस कधी येणार इथं पासून ते कोणते पीक घेणार, याचे मार्गदर्शन या आधुनिक काळात करण्याची गरज निर्माण झाली आहे. तसेच पारंपारिक पिकांशिवाय बदलत्या हवामानास जे पीक बळी पडत नाही, त्या पिकांचा अवलंब शेतकऱ्यांनी केला पाहिजे. तरच शेतकऱ्याला दिलासा मिळेल. पर्यावरणाचा ऱ्हास झाल्यामुळे जे पावसाचे सर्जिकल स्ट्राइक होत आहेत, त्याला तोंड देण्यासाठी हाच एकमेव उपाय समोर दिसत आहे, हे नक्की !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# सुळेंना सत्तेची तहान लागली असेल!

## शिवसेनेची नवी पिढी भाजपाने फोडली : संजय राऊत

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शिवसेनेचे (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांना टोला लगावला आहे. सत्तेची तहान लागली असली तरी कोणी गटारातलं पाणी प्यायचं नसतं असा सल्ला राऊत यांनी खासदार सुळे यांना दिला आहे. शरद पवारांच्या पक्षातील काही नेते भाजपाबरोबर जाणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून प्रसारमाध्यमांमध्ये रंगत आहे. त्यावर राऊत यांनी त्यांची भूमिका मांडली. तसेच त्यांनी विश्वास व्यक्त केला आहे की नवी पिढी भाजपाबरोबर जाणार नाही.**



खासदार संजय राऊत यांनी काही वेळापूर्वी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले की “शिवसेनेची नवी पिढी भाजपाने फोडली”. त्यावरून त्यांना विचारण्यात आलं की अलीकडेच चर्चा रंगू लागली आहे की शरद पवारांची नवी पिढी भाजपाबरोबर जाण्यास व्याकूळ असल्याचं बोललं जात आहे, महायुतीमधील अजित पवारांचं महत्त्व कमी करण्यासाठी भाजपा या नव्या पिढीला जवळ घेऊ शकते का? शरद पवारांची नवी पिढी असा निर्णय घेऊ शकते का? त्यावर राऊत म्हणाले, “मला तसं वाटत नाही. मात्र, तुम्ही माध्यमं वारंवार सुप्रिया सुळे यांचं नाव घेताय. कदाचित त्यांना सत्तेची तहान लागली असेल”.शिवसेनेचे (ठाकरे) खासदार म्हणाले, “तुम्ही प्रसारमाध्यमं सुप्रिया सुळे यांचं व अन्य काही नेत्यांची नावं घेत आहात. त्यांना नक्कीच सत्तेची तहान लागली असेल.

पण तहान लागल्यावर कोणी गटारातलं किंवा गढूळ पाणी पित नाही. त्यांना सगळ्यांना नक्कीच सत्तेची तहान लागली असेल. परंतु, नेमक्या कोणत्या डबक्यात उडी मारायची किंवा महासागरात उडी मारायची म्हटलं तरी लाटांचा सामना करावा लागणार आहे. महासागरात इतक्या मोठ्या लाटा उसळल्या आहेत, तिथे बरीच गर्दी आहे. त्यामुळे प्रत्येकाला आपलं स्थान शोधावं लागेल. तिकडे आधी गेलेले लोक आपल्या अस्तित्वासाठी धडपड करत आहेत. त्यात आता नवीन लोक तिथे जाऊन काय करणार आहेत?”संजय राऊत यांच्या या वक्तव्यामुळे महाविकास आघाडीत सर्व काही आलबेल आहे का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. एकीकडे राहुल गांधी व काँग्रेसच्या नेत्यांनी वीर सावरकरांबाबत केलेल्या वक्तव्यांमुळे शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे कोंडीत सापडले आहेत. दुसऱ्या बाजूला, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षातील नेते महायुतीत सहभागी होणार असल्याची चर्चा रंगत आहे.खासदार संजय राऊत यांनी काही वेळापूर्वी मुंबईत प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले की “शिवसेनेची नवी पिढी भाजपाने फोडली”. त्यावरून त्यांना विचारण्यात आलं की अलीकडेच चर्चा रंगू लागली आहे की शरद पवारांची नवी पिढी भाजपाबरोबर जाण्यास व्याकूळ असल्याचं बोललं जात आहे, महायुतीमधील अजित पवारांचं महत्त्व कमी करण्यासाठी भाजपा या नव्या पिढीला जवळ घेऊ शकते का? शरद पवारांची नवी पिढी असा निर्णय घेऊ शकते का? त्यावर राऊत म्हणाले, “मला तसं वाटत नाही. मात्र, तुम्ही माध्यमं वारंवार सुप्रिया सुळे यांचं नाव घेताय.

### डबक्यात पडून मुलाचा मृत्यू

कदाचित त्यांना सत्तेची तहान लागली असेल”.शिवसेनेचे (ठाकरे) खासदार म्हणाले, “तुम्ही प्रसारमाध्यमं सुप्रिया सुळे यांचं व अन्य काही नेत्यांची नावं घेत आहात. त्यांना नक्कीच सत्तेची तहान लागली असेल. पण तहान लागल्यावर कोणी गटारातलं किंवा गढूळ पाणी पित नाही. त्यांना सगळ्यांना नक्कीच सत्तेची तहान लागली असेल. परंतु, नेमक्या कोणत्या डबक्यात उडी मारायची किंवा महासागरात उडी मारायची म्हटलं तरी लाटांचा सामना करावा लागणार आहे. महासागरात इतक्या मोठ्या लाटा उसळल्या आहेत, तिथे बरीच गर्दी आहे. त्यामुळे प्रत्येकाला आपलं स्थान शोधावं लागेल. त्यात आता नवीन लोक तिथे जाऊन काय करणार आहेत?”संजय राऊत यांच्या या वक्तव्यामुळे महाविकास आघाडीत सर्व काही आलबेल आहे का असा प्रश्न उपस्थित केला.

# राज्य महिला आयोगातील अनेक पदे रिक्त

## तक्रारींचा वाढता ओघ, मात्र समुपदेशकांचा अभाव

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**मुळशीतील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणानंतर चर्चेत आलेल्या राज्य महिला आयोगावर एकही अशासकीय सदस्य नेमण्यात आलेला नाही. आयोगाच्या कर्मचाऱ्यांची निम्मी पदे अनेक वर्षांपासून रिक्त आहेत. गेल्या पाच वर्षांत आयोगाच्या निधीत कपात केली जात असून राज्यभरातून दररोज येणाऱ्या शेकडो महिलांच्या तक्रारी अवघे तीन समुपदेशक हाताळत असल्याची माहिती समोर आली आहे.**

‘राज्य महिला आयोगा’कडे वर्षाला सरासरी ९ हजार तक्रारी प्राप्त होतात. अध्यक्ष व पोलीस महासंचालकांखेरीज आयोगावर सहा अशासकीय सदस्य नेमण्याचा नियम आहे, मात्र शासनाकडे सदर प्रकरणाची नस्ती अनेक महिने प्रलंबित आहे.आयोगाला ३५ पदे मंजूर आहेत. पैकी १८ पदे रिक्त आहेत. आयोग कार्यालयात दैनंदिन सरासरी ७५ महिला प्रत्यक्ष तक्रारी करतात. मात्र, त्यांना सल्ला देण्यासाठी आयोगामध्ये अवघे तीन समुपदेशक कार्यरत आहेत. २०१७ नंतर आयोगाने संकेतस्थळावर वार्षिक अहवाल सादर केलेला नाही. वर्ष २०१८-१९ मध्ये आयोगाला ८ कोटी १४ लाख इतके सहाय्यक अनुदान दिले होते. त्यामध्ये दरवर्षी कपात करण्यात येत असून मागच्या वर्षी हा निधी ४ कोटी ६३ लाखांवर आला. महिलांच्या छळाच्या तक्रारींचे व्यवस्थापन करण्यासाठी पोर्टल नाही.आयोगाकडे मेल, दूरध्वनी, टपाल, परहस्ते, प्रत्यक्ष या मार्गाने दरमहिना ७०० ते ८०० तक्रारी येतात. समुपदेशन करून तोडगा, कायदेशीर सल्ला किंवा पोलिसांना गुन्हा नोंदवण्याचे आदेश या तीन प्रकारे आयोगाकडून त्याच दिवशी तक्रारीवर निर्णय घेतला जातो. उपलब्ध मनुष्यबळ व साधनसामग्रीत कामकाज पूर्ण क्षमतेने सुरू आहे. आयोगाच्या विद्यामान अध्यक्ष रुपाली चाकणकर यांच्या साडेतीन वर्षांच्या कारकिर्दीत महिलांच्या समस्या दूर करण्यासंदर्भात आयोगाने एकही अभ्यास केला नाही. सरकारला कोणतीही शिफारस केलेली नाही.

### वर्षांत एकही शिफारस नाही

महिला व बालविकास विभागाच्या अंतर्गत हा विभाग येत असून या विभागाच्या मंत्री राष्ट्रवादी काँग्रेसच्या आदिती तटकरे आहेत.राष्ट्रीय महिला आयोगाकडे येणाऱ्या तक्रारींमध्ये हुंड्यासाठी छळाच्या तक्रारी तिसऱ्या क्रमांकावर आहेत. राज्य महिला आयोगाकडे मात्र हुंड्यासाठी छळ या तक्रारीची वर्गवारी केलेली नाही. सामाजिक विषय या ढोबळ वर्गवारीत हुंडापीडितांच्या तक्रारी वर्ग केल्या जातात. धक्कादायक म्हणजे वर्ष २०२४ मध्ये राज्यात १४९ महिलांचा हुंडाबळी गेले आहेत.‘राज्य महिला आयोगा’कडे वर्षाला सरासरी ९ हजार तक्रारी प्राप्त होतात. अध्यक्ष व पोलीस महासंचालकांखेरीज आयोगावर सहा अशासकीय सदस्य नेमण्याचा नियम आहे, मात्र शासनाकडे सदर प्रकरणाची नस्ती अनेक महिने प्रलंबित आहे.आयोगाला ३५ पदे मंजूर आहेत. पैकी १८ पदे रिक्त आहेत. आयोग कार्यालयात दैनंदिन सरासरी ७५ महिला प्रत्यक्ष तक्रारी करतात.

# आमचे खासदार इकडे-तिकडे फिरत आहेत!

## जयराम रमेश यांचे विधान चर्चेत; भाजपाची जोरदार टीका

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**काँग्रेसचे वरिष्ठ नेते जयराम रमेश हे गेल्या अनेक दिवसांपासून ऑपरेशन सिंदूर आणि परदेशात पाठवण्यात आलेल्या सर्व पक्षीय नेत्यांच्या शिष्टमंडळांबद्दल सरकारला सातत्याने प्रश्न विचारत आहेत. दरम्यान रमेश यांनी गुरूवारी केलेल्या एका विधानामुळे वेगळाच वाद सुरू झाला आहे. पहलगाम येथे हल्ला करणारे दहशतवादी जसे खुलेपणाने फिरत आहेत तसेच आपले नेतेही फिरत असल्याचे विधान रमेश यांनी केले आहे. यानंतर त्यांच्यावर राजकीय वर्तुळातून टीका केली जात आहे.**



महत्त्वाची बाब म्हणजे, जे साथ शिष्टमंडळ पाठवण्यात आले आहेत त्यामध्ये अनेक काँग्रेसच्या नेत्यांचा देखील समावेश आहे. ज्यापैकी एका टीमचे नेतृत्व काँग्रेसचे खासदार शशी थरूर करत आहेत.एएनआयशी बोलताना, राज्यसभेचे खासदार रमेश यांनी गुरुवारी म्हणाले की, भाजपा आणि भाजपाच्या नेत्यांना पाकिस्तानशी काही देणं-घेणं नाही. एक महिना झालं, २२ एप्रिल रोजी पहलगामचा हल्ला झाला होता. आजही ते दहशतवादी इकडे-तिकडे फिरत आहेत. डिसेंबर २०२३ रोजी पुंछमधील दहशतवादी हल्ल्यात त्यांची भूमिका होती, ऑक्टोबर २०२४ मध्ये गांदरबलमध्ये दहशतवादी हल्ला झाला त्यामध्ये त्यांची भूमिका होती, त्याच महिन्यात गुलमर्ग येथे एक दहशतवादी हल्ला झाला होता, त्यामध्येही त्यांची भूमिका होती. म्हणजेच १८ महिन्यांत पहलगाम येथील दहशतवाद्यांनी चार दहशतवादी हल्ले केले आहेत. आज ते (दहशतवादी) इकडे-तिकडे फिरत आहेत. आमचे खासदारही इकडे-तिकडे फिरत आहेत आणि दहशतवादीही इकडे-तिकडे फिरत आहेत. गंभीरतेने आम्ही हे प्रश्न विचार आहोत, याची उत्तरं दिली जात नाहीत. भाजपा फक्त काँग्रेस पक्षाला लक्ष्य करते."दरम्यान भाजपाकडून रमेश यांच्या विधानावर टीका करण्यात आली आहे. आपल्या खासदारांची तुलना दहशतवाद्यांशी करणारे त्यांचे विधान हे सर्वात क्रूर आहे असे भाजपाने म्हटले आहे. तर भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते प्रदीप भंडारी यांनी पोस्ट करत म्हटले आहे की, "राहुल गांधी यांचा उजवा हात असलेले जयराम रमेश खासदारांची तुलना दहशतवाद्याशी करतात." शशी थरूर यांनी मोदी सराकरच्या कार्यकाळात केलेल्या सर्जीकल स्ट्राईक या पहिल्यांदाच करण्यात आल्याच्या संदर्भातील विधानानंतर काँग्रेसने त्यांना जाहीरपणे फटकारले होते. थरूर यांन पनामा येथे एका बैठकीत बोलताना हे विधान केले होते. दरम्यान काँग्रेसचे प्रवक्ते उदीत राज यांनी यूपीए सरकारच्या काळात देखील अशा स्ट्राईक करण्यात आल्या होत्या मात्र त्यांचे अशा प्रकारे राजकीय भांडवल करण्यात आले नव्हते असे म्हटले आहे.दरम्यान एएनआयशी बोलताना जयराम रमेश यांनी पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरवर चर्चा करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन न बोलावल्याबद्दल भाजपा सरकारवर टीका केली आहे. विरोधी पक्षांकडून विशेष अधिवेशन बोलवण्यात यावे अशी मागणी केली जात होती.रमेश म्हणाले की, आता ऐकायला मिळत आहे की आणीबाणीच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त २५ आणि २६ जून रोजी विशेष अधिवेशन बोलावले जाऊ शकते. एक व्यक्ती ११ वर्षांपासून अघोषित आणीबाणी चालवत आहे, जी २६ मे २०१४ पासून लागू आहे ते एक विशेष अधिवेशन बोलवू इच्छित आहेत. ५० वर्षांपूर्वी काय झालं? आजचे मुद्द्यांपासून लक्ष्य विचलित करण्यासाठी ५० व्या वर्धापन दिनाबद्दल बोलत आहेत."

### अधिवेशन न बोलवण्यावरून टीका

महत्त्वाची बाब म्हणजे, जे साथ शिष्टमंडळ पाठवण्यात आले आहेत त्यामध्ये अनेक काँग्रेसच्या नेत्यांचा देखील समावेश आहे. ज्यापैकी एका टीमचे नेतृत्व काँग्रेसचे खासदार शशी थरूर करत आहेत.एएनआयशी बोलताना, राज्यसभेचे खासदार रमेश यांनी गुरुवारी म्हणाले की, भाजपा आणि भाजपाच्या नेत्यांना पाकिस्तानशी काही देणं-घेणं नाही. एक महिना झालं, २२ एप्रिल रोजी पहलगामचा हल्ला झाला होता. आजही ते दहशतवादी इकडे-तिकडे फिरत आहेत. डिसेंबर २०२३ रोजी पुंछमधील दहशतवादी हल्ल्यात त्यांची भूमिका होती, ऑक्टोबर २०२४ मध्ये गांदरबलमध्ये दहशतवादी हल्ला झाला त्यामध्ये त्यांची भूमिका होती.

# संरक्षण प्रकल्पांत बेसुमार दिरंगाई !

## हवाई दलप्रमुख ए. पी. सिंग यांचे खडेबोल

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**संरक्षणविषयक विविध प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण होण्याच्या बाबतीत अमर्याद दिरंगाई होत असल्याचे हवाई दलप्रमुख एअर चिफ मार्शल ए. पी. सिंग यांनी खडसावले. एखादी गोष्ट पूर्ण करण्याचे 'वचन' दिले गेल्यानंतर ती वेळेत पूर्ण झाल्याचे आपल्या तरी स्मरणात नाही, अशा शब्दांत त्यांनी यंत्रणांचे वाभाडे काढले.**




आयोजित व्यापार परिषदेमध्ये बोलताना हवाई दल प्रमुखांनी 'तेजस लाईट कॉम्बॅट जेट' मिळण्याबाबत हिंदुस्तान एअरोनॉटिक्स लिमिटेडकडून झालेल्या दिरंगाईवर बोट ठेवले. "वेळ न पाळणे ही महत्त्वाची समस्या आहे. एकदा वेळ दिली गेली, की त्यानंतर एकही प्रकल्प दिलेल्या वेळेत पूर्ण होत नाही. या विषयामध्ये आपण लक्ष घातले पाहिजे. एखादे वचन पाळणार नसू, तर ते का दिले जाते?," असा सवाल सिंग यांनी केला. कधीकधी करार करतानाच आपल्याला खात्री असते, की हे वेळेमध्ये पूर्ण होणार नाही. मात्र आपण पुढे काय होईल ते बघू असे म्हणून सह्या करतो... अर्थात ही प्रक्रियाच चुकीची आहे, अशा शब्दांत हवाई दल प्रमुखांनी यंत्रणेचे वाभाडे काढले.'मेक इन इंडिया' मोहिमेला अनुसरून जास्तीत जास्त करण्याचा प्रयत्न हवाई दल करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "एकेकाळी भारतीय उद्योग आपल्या गरजा पूर्ण करू शकेल, आपल्याला जे अपेक्षित आहे ते देऊ शकेल याबाबत आम्हाला शंका होत्या. त्यामुळे आम्ही बाहेर शोध घेत होतो. मात्र गेल्या दशकभरात परिस्थिती बदलली. आम्हाला जेव्हा आम्ही विचार करायला लागलो, तेव्हा लक्षात आले की भारतातच अनेक संधी उपलब्ध आहेत," असे सिंग यांनी स्पष्ट केले. भविष्यात सज्ज राहण्यासाठी आपल्याला आतापासून तयारी करावी लागेल, अशी पुष्टीही त्यांनी जोडली.'ऑपरेशन सिंदूर'नंतर प्रथमच जाहीर भाष्य करताना ही मोहीम म्हणजे राष्ट्रीय विजय असल्याचे हवाई दल प्रमुख म्हणाले.


### 'देव आमच्याबरोबर होता'

"आमचा मार्ग सत्याचा असल्यामुळेच देवदेखील आमच्याबरोबर होता, असे वाटते. ही मोहीम प्रत्येक पातळीवर अत्यंत व्यावसायिक रितीने हाताळली गेली. सर्व यंत्रणा, सर्व सुरक्षादले एकदिलाने काम करत होती आणि जेव्हा सत्य आपल्याबरोबर असते, तेव्हा सर्वकाही ठीकच होते," असे सिंग म्हणाले. नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश त्रिपाठी यांनी युद्धाचे स्वरूप बदलत असून नवनवे तंत्रज्ञान वापरले जात असल्याचे अधोरेखित केले.आयोजित व्यापार परिषदेमध्ये बोलताना हवाई दल प्रमुखांनी 'तेजस लाईट कॉम्बॅट जेट' मिळण्याबाबत हिंदुस्तान एअरोनॉटिक्स लिमिटेडकडून झालेल्या दिरंगाईवर बोट ठेवले. "वेळ न पाळणे ही महत्त्वाची समस्या आहे.

# मेसेज माझ्याच अकाउंटवरून गेला

अभिनेत्री प्राची पिसाटने काही दिवसांपूर्वी अभिनेते सुदेश म्हशिलकर यांच्या फेसबुक अकाऊंटवरून आलेल्या आक्षेपार्ह मेसेजचे स्क्रीनशॉट सोशल मीडियावर शेअर केले होते. यानंतर मराठी मनोरंजन विश्वात एकच खळबळ उडाली होती. सुदेश म्हशिलकरांवर अनेक कलाकारांकडून टीका करण्यात आली होती. मात्र, एवढे दिवस त्यांनी या प्रकरणावर काहीच प्रतिक्रिया दिली नव्हती. आता जवळपास पाच दिवसांनी सविस्तर पोस्ट शेअर करत सुदेश म्हशिलकरांनी आपली बाजू स्पष्ट केली आहे.

याशिवाय त्यांचं फेसबुक अकाऊंट हॅक झाल्याची तक्रार भाईंदर पोलीस ठाण्यात दिल्याचं त्यांनी या पोस्टमध्ये नमूद केलं आहे. तक्रारीची लेखी प्रत देखील अभिनेत्यांनी सर्वांबरोबर शेअर केली आहे.सुदेश म्हशिलकरांनी त्यांच्या पोस्टमध्ये एकूण सहा मुद्दे सांगितले आहेत. या पोस्टमध्ये त्यांनी नेमकं काय म्हटलंय सविस्तर जाणून घेऊयात...खरंतर मी या विषयावर काहीही लिहिणार नव्हतो.



पण गेले काही दिवस जे काही सोशल मीडियावर सुरू आहे, त्यावर अनेक लोकांचे, मीडियाचे प्रतिसाद पाहून शांत बसणं मला शक्य झालं नाही. म्हणून आज इथे माझं म्हणणं मुद्द्यांनुसार मांडत आहे. M1) "हा मेसेज खरंच मीच केला का?" तो मेसेज माझ्याच अकाउंटवरून गेला आहे. पण तो नेमका केव्हा? कसा गेला? कोणीतरी अकाउंटमध्ये शिरलं का? की कुठे गैरवापर झाला? याचा मला पत्ता नाही. मी इथे माझ्या फोनमधील मूळ चॅट्सचे स्क्रीनशॉट्स जोडत आहे. ज्यामध्ये तुम्हाला स्पष्टपणे हास्यविनोदाच्या स्वरात लिहिलेलं दिसेल. जर खरंच मी असा मेसेज केला असता आणि तो इतका आक्षेपार्ह असता, तर त्यावर प्रतिक्रिया देताना "असं का पाठवलं?" एवढं तरी कुणीही विचारलं असतं.

पण इथे उलट, मेसेजचा संदर्भ तोडून, त्यातून चुकीचा अर्थ लावण्याचा प्रयत्न झाला आहे. लोकांना अर्धवट माहिती देऊन अशाप्रकारे दिशाभूल करणं हे सुद्धा चुकीचं आहे.माझ्या फोनमध्ये 'PRACHI PISAT' या नावाने आधीच नंबर सेव्ह आहे. मला त्यासाठी फेसबुकवर नंबर मागायची गरजच नव्हती.

# त्याच्या डोळ्यांत मला खूप कौतुक

पडद्यावर काम करणारे कलाकार अनेकदा त्यांच्या शूटिंगदरम्यानच्या आठवणीदेखील सांगत असतात. अनेकदा या आठवणी या कलाकारांसह प्रेक्षकांनादेखील भारावून टाकतात. एका मुलाखतीत अभिनेत्री मृण्मयी देशपांडेने अभिनेते सुनील बर्वे यांच्याबरोबर काम करण्याचा अनुभव सांगितला होता.मृण्मयी देशपांडेने 'राजश्री मराठी'ला मुलाखत दिली होती. या मुलाखतीत अभिनेत्रीने सुनील बर्वे यांच्याबरोबर काम करण्याचा अनुभव सांगितला होता. मृण्मयी म्हणालेली, "कुंकू या मालिकेचे शूटिंग सुरू होतं. आमच्या कुठल्यातरी सीनचे शूटिंग सुरू होते. बोलता-बोलता जानकीच्या डोळ्यात पाणी येतं, असा काहीतरी सीन होता. मी ते वाक्य बोलले. मी बोलतानाच मला दोन सेकंद सुनील दादाच्या चेहऱ्यावरचे भाव मला दिसले. तो नरसिंह म्हणून तो व्यक्त झाला नाही. त्याच्या डोळ्यांत मला खूप कौतुक दिसलं."सीन कट झाला. तो काहीच बोलला नाही. त्याने माझा हात पकडला आणि तो मला मेकअप रुममध्ये घेऊन गेला. त्याने अचानक असे केल्यामुळे मला वाटलं की मी काही चुकीचं केलं का? संपूर्ण सेटसमोर त्याने मला काही न बोलता तो मला घेऊन गेला. त्यामुळे नेमकं काय झालं, हे मला कळेना. त्याने त्याचं पाकिट उघडलं. त्यादिवशी त्याच्या पाकिटात जितके पैसे होते, ते सगळे माझ्या हातात ठेवले."तो मला म्हणाला की बाळा, तू जे आता केलंस ना ते जप. तुझं कौतुक करण्यासाठी माझ्याकडे आता शब्द नाहीत. आता माझ्या पाकिटात २ कोटी रुपये असते, तर मी तेसुद्धा तुला दिले असते, इतका छान तू अभिनय केलास, तो मला आवडला. साहजिकच त्याचं ते बोलणं ऐकून मी भारावून गेले होते. मी खूप खूष झाले होते. तो माझ्यासाठी बेंचमार्क झाला." अभिनेत्री असेही म्हणाली होती, "मी 'सुखन'चा प्रयोग बघायला गेले होते. 'सुखन'मधील ओम भूतकरचं सादरीकरण बघून मला खूप आवडलं. त्या दिवशी 'सुखन'चा प्रयोग झाल्यानंतर स्टेजवर गेले. माझ्या पर्समध्ये जितके पैसे होते, ते सगळे काढले आणि मी ते ओमच्या हातावर ठेवले. मी त्याला सांगितलं की हे असं कौतुक कोणीतरी माझं केलं आहे. कदाचित माझा अभिनय पाहून सुनील दादाला त्यावेळी छान वाटलं असेल. मी ओमचं सादरीकरण पाहून वेडी झाले होते.



# लोकांना माझी श्रीमंती दिसते

बॉलीवूडमध्ये नोरा आली आणि बॉलीवूडचा चेहराच बदलून गेला. वेगळ्या डान्स पर्वाला सुरुवात झाली. बॉलीवूडची प्रसिद्ध आयटम गर्ल म्हणून नोराचे नाव घेतलं जाऊ लागले. केवळ भारतातच नाहीतर जगभरामध्ये नोराच्या डान्सचे शो होऊ लागले. काही दिवसांपूर्वी तिची वर्ल्ड टूर झाली. त्याला चाहत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला होता. नोराचा सोशल मीडियावर चाहतावर्ग मोठा आहे. तिला इंस्टावर फॉलो करणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. नोराच्या वेगवेगळ्या लूक्सवर चाहते फिदा होतात. त्या फोटोंवर दिलखुलासपणे व्यक्तही होतात. सध्या नोरा टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध अशा रियॅलिटी शो मध्ये परिक्षकाच्या भूमिकेत आहे. याशिवाय आगामी काळात ती बॉलीवूडच्या मोठ्या प्रोजेक्टमध्ये दिसणार आहे. नोरा ही वेगवेगळ्या कारणांमुळे ट्रोलही होताना दिसते. सुकेश चंद्रशेखरनं केलेल्या हजारो कोटींच्या घोटाळ्यात नोराचं नाव आल्यानं तिची डोकेदुखी वाढली आहे. तिला पटियाला कोर्टानं हजर राहण्याचे आदेशही दिले होते. यासगळ्यात नोरावर सोशल मीडियातून तीव्र शब्दांत नेटकऱ्यांनी टीका केली. त्यामुळे व्यथीत झालेल्या नोरानं एका मुलाखतीतून टीका करणाऱ्यांना चांगलेच सुनावले आहे. बॉलीवूडमध्ये गेल्या सहा ते सात वर्षांपासून सतत सेलिब्रेटी म्हणून मिरवणाऱ्या नोरानं सांगितले की, चाहत्यांना माझे सेलिब्रेटीपद दिसते. माझी श्रीमंती दिसते, माझ्या सौंदर्यावर ते भाळतात पण नोरा कोण होती, ती कुठून आली याविषयी त्यांना काहीही माहिती नाही. नोरा कोणत्या गल्लीबोळात राहायला होती हे त्यांना ठाऊक नाही. नोरानं खूप संघर्ष केला आहे. सुरुवातीपासून माझा प्रवास खूपच कष्टाचा राहिला आहे. नेटकऱ्यांना काहीही माहिती नसताना कोणत्याही गोष्टींवरुन टीका करतात तेव्हा वाईट वाटते.

# लाखात एक आमचा दादा



अभिनेत्री मृण्मयी गोंधळेकर सध्या 'लाखात एक आमचा दादा' या मालिकेत काम करताना दिसत आहे. या मालिकेतील तिने तुळजा ही भूमिका साकारली आहे. एक आदर्श पत्नी, आदर्श वहिनी अशी तिची भूमिका पाहायला मिळते. तिच्या पतीला म्हणजेच सूर्याला ती वेळोवेळी प्रत्येक संकटात साथ देते. सूर्याच्या चारही बहिणींना ती आईप्रमाणे जीव लावते, त्यांच्यावर प्रेम करते. त्यांना योग्य मार्गदर्शनही करते. तुळजाचे वडील म्हणजेच डॅडी सूर्याविरुद्ध कट कारस्थान करताना दिसतात. तुळजाने स्वतःच्या वडिलांचा खरा चेहरा सूर्यासमोर आणण्याचा अनेकदा प्रयत्न केला आहे. मात्र, सूर्या डॅडींविरुद्ध काहीही ऐकून घेत नसल्याचे दिसले. तुळजाच्याच प्रयत्नाने सूर्याची आई आशा जगताप

# आरसीबी 9 वर्षांनंतर फायनलमध्ये!

## विराटचा इशारा अन् अनुष्काने दिलेली रिॲक्शन व्हायरल



**।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने करून दाखवलं आहे. जगातील सर्वात मोठा चाहतावर्ग असलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आयपीएल २०२५ स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश केला आहे.या स्पर्धेतील क्वालिफायर १ चा सामना पंजाब किंग्ज आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या दोन्ही संघांमध्ये पार पडला. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या गोलंदाजांनी पंजाबला अवघ्या १०१ धावांवर ऑलआऊट केलं. या धावांचा पाठलाग करताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने एकतर्फी विजयाची नोंद केली. या विजयानंतर विराट कोहली आणि अनुष्का शर्माचा एक फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ आयपीएल २०२५ स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश करणारा पहिला संघ ठरला आहे.रजत पाटीदारच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने साखळी फेरीतील सामन्यांमध्ये १४ पैकी ९ सामने जिंकून गुणतालिकेत दुसरं स्थान गाठलं.या हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा रेकॉर्ड दमदार राहिला आहे. हा रेकॉर्ड पाहता,रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानलं जात आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ विजयापासून केवळ १ पाऊल दूर आहे.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजयानंतर विराट कोहलीचा एक फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजयात विराट कोहलीचाही मोलाचा वाटा आहे. पंजाब किंग्जविरूद्ध झालेल्या सामन्यात आव्हान छोटं होतं, पण संघाला वादळी सुरूवातीची गरज होती. विराटने २ चौकार खेचत १२ धावा केल्या. त्यानंतर तो बाद होऊन माघारी परतला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून फिल सॉल्टने नाबाद ५६ धावांची खेळी करत संघाला ८ गडी राखून विजय मिळवून दिला. या विजयानंतर विराट कोहलीचा जल्लोष पाहण्यासारखा होता. त्याने मैदानात येऊन स्टँडमध्ये असलेल्या अनुष्का शर्माकडे पाहिलं आणि केवळ १ सामना शिल्लक असा इशारा केला.

अनुष्का शर्मानेही टाळ्या वाजवून त्याचं कौतुक केलं.या सामन्याबद्दल बोलायचं झालं, तर या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघातील गोलंदाजांनी प्रथम फलंदाजीसाठी आलेल्या पंजाब किंग्जच्या फलंदाजांना एकापाठोपाठ एक धक्के दिले. सलामीचे फलंदाज प्रियांश आर्या ७ तर प्रभसिमरन सिंग १८ धावांवर तंबूत परतले.त्यानंतर जोस इंग्लिश ४, श्रेयस अय्यर २,नेहाल वढेरा ८, मार्कस स्टोइनिस २६, शशांक सिंग ३, मुशीर खान ०, अजमतुल्लाह उमरजई १८ आणि हरप्रीत ब्रार ४ धावांवर तंबूत परतला. पंजाब किंग्जचा संपूर्ण डाव अवघ्या १०१ धावांवर आटोपला. या धावांचा पाठलाग करताना फिल सॉल्टने ५६ धावांची खेळी करत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला ८ गडी राखून विजय मिळवून दिला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ आयपीएल २०२५ स्पर्धेतील अंतिम फेरीत प्रवेश करणारा पहिला संघ ठरला आहे.

रजत पाटीदारच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने साखळी फेरीतील सामन्यांमध्ये १४ पैकी ९ सामने जिंकून गुणतालिकेत दुसरं स्थान गाठलं.या हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा रेकॉर्ड दमदार राहिला आहे. हा रेकॉर्ड पाहता,रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानलं जात आहे.

### बंगळुरूचा दमदार विजय

.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा संघ विजयापासून केवळ १ पाऊल दूर आहे.रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजयानंतर विराट कोहलीचा एक फोटो सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजयात विराट कोहलीचाही मोलाचा वाटा आहे. पंजाब किंग्जविरूद्ध झालेल्या सामन्यात आव्हान छोटं होतं, पण संघाला वादळी सुरूवातीची गरज होती. विराटने २ चौकार खेचत १२ धावा केल्या. त्यानंतर तो बाद होऊन माघारी परतला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूकडून फिल सॉल्टने नाबाद ५६ धावांची खेळी करत संघाला ८ गडी राखून विजय मिळवून दिला. या विजयानंतर विराट कोहलीचा जल्लोष पाहण्यासारखा होता. त्याने मैदानात येऊन स्टँडमध्ये असलेल्या अनुष्का शर्माकडे पाहिलं आणि केवळ १ सामना शिल्लक असा इशारा केला. या सामन्याबद्दल बोलायचं झालं, तर या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

# कॅच ऑफ द टूर्नामेंट?

## पंजाब किंग्जच्या फलंदाजांना नागीण डान्स करायला भाग पाडलं

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**आयपीएल २०२५ स्पर्धेतील क्वालिफायर १ चा सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज या दोन्ही संघांमध्ये सुरू आहे. या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. हा निर्णय योग्य ठरवत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या गोलंदाजांनी पंजाब किंग्जच्या फलंदाजांना नागीण डान्स करायला भाग पाडलं. पंजाबचा संपूर्ण डाव अवघ्या १०१ धावांवर आटोपला.**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या गोलंदाजांनी पहिल्या षटकापासून पंजाबच्या फलंदाजांवर दबाव बनवून ठेवला. पंजाबचे फलंदाज सुरूवातीपासूनच दबावात दिसून आले. याचा फायदा घेत, आरसीबीच्या गोलंदाजांनी पंजाबला एकापाठोपाठ एक मोठे धक्के दिले. सलामी जोडीकडून मोठ्या अपेक्षा होत्या, पण प्रभसिमरनसिंग आणि प्रियांश आर्या महत्वाच्या सामन्यात स्वस्तात माघारी परतला.प्रियांश आर्या ७ तर प्रभसिमरन सिंग अवघ्या १८ धावांवर माघारी परतला. गेल्या सामन्यात तुफान फटकेबाजी करणारा जोस इंग्लिश या डावात अवघ्या ४ धावा करत तंबूत परतला. कर्णधार श्रेयस अय्यरही २ धावा करत माघारी परतला. त्यानंतर नेहाल



वढेरा ८, मार्कस स्टोइनिस २६, शशांक सिंग ३, मुशीर खान ०, अजमतुल्लाह उमरजई १८ आणि हरप्रीत ब्रार अवघ्या ४ धावांवर माघारी परतला. पंजाब किंग्ज संघाचा संपूर्ण डाव अवघ्या १०१ धावांवर आटोपला.या डावातील १५ वे षटक टाकण्यासाठी जोश हेजलवूड गोलंदाजीला आला.या षटकातील पहिल्याच चेंडूवर अजमतुल्लाह उरमजईने मोठा फटका खेळण्याचा प्रयत्न केला. पण, चेंडू बॅटची कडा घेत यष्टीरक्षण करत असलेल्या जितेश शर्माच्या हातात गेला. हा झेल मुळीच सोपा नव्हता. कारण चेंडू बॅटला लागताच वेगाने वर गेला. पण जितेशने उडी मारून एका हाताने भन्नाट झेल घेतला. हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे.या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या गोलंदाजांचा बोलबाला पाहायला मिळाला. हिरव्या खेळपट्टीचा रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या गोलंदाजांनी पुरेपूर फायदा घेतला. यश दयाल, जोश हेजलवूड, भुवनेश्वर कुमार आणि सुयश शर्मा या गोलंदाजांनी पंजाबच्या फलंदाजांना चांगलाच घाम फोडला. या सामन्यात गोलंदाजी करताना सुयश शर्मा आणि जोश हेजलवूडने प्रत्येकी ३-३ गडी बाद केले. तर यश दयालने २, भूवनेश्वर कुमारने १ आणि रोमारीयो शेफर्डने १ गडी बाद केलापंजाबच्या फलंदाजांवर दबाव बनवून ठेवला. पंजाबचे फलंदाज सुरूवातीपासूनच दबावात दिसून आले.

### जितेश शर्माने घेतला भन्नाट कॅच

याचा फायदा घेत, आरसीबीच्या गोलंदाजांनी पंजाबला एकापाठोपाठ एक मोठे धक्के दिले. सलामी जोडीकडून मोठ्या अपेक्षा होत्या, पण प्रभसिमरनसिंग आणि प्रियांश आर्या महत्वाच्या सामन्यात स्वस्तात माघारी परतला.प्रियांश आर्या ७ तर प्रभसिमरन सिंग अवघ्या १८ धावांवर माघारी परतला.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
। शुक्रवार ।
। दि. 30 मे 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S
# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT
AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN
Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



**BBA**
Bachelor of Business Administration



**BCA**
Bachelor of Computer Applications

### Highlights:
- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**
**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**
**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL
SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
CREATIVE
Where There is
Creativity, There is
Master Mind
ADMISSIONS
OPEN FOR
NURSERY TO 12TH
7
STAR
RANKING
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
A++ Grade
In Leadership & Quality
Management
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
Website : www.http://mastermindglobalschool.com


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
Computer Science
Crop Science
Electronics
Mechanical / Technical Automobile
Information Technology (IT)
For Commerce Stream
Banking
Marketing & Sales
Office Management
Small Industries & Self employment
Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241